# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक २८.०८.२०२६ शुक्रवार**

**१) उत्कृष्ट तपास करणारे अधिकारी व अंमलदार व पैरवी अधिकारी यांचा मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते गौरव:**

मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी पोलीस आयुक्तालय अंतर्गत येणारे पोलीस ठाणे पाचपावली, एमआयडीसी, कोतवाली येथील उत्कृष्ट काम करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार व पैरवी अधिकारी यांचा आज दिनांक २८.०८.२०२६ रोजी पोलीस भवन येथील दालनात प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा गौरव केला.

ज्यामध्ये पोलीस ठाणे पाचपावली गैरकायद्याची मंडळी जमवुन अग्निशस्त्र व शस्त्राद्वारे खुनाचा प्रयत्न करणारे आरोपींना अटक करुन त्यांचेजवळून गुन्हयातील मुद्येमाल हस्तगत करुन गुन्हयाचा तपास करुन गुन्हयामध्ये आरोपींवर मकोका अन्वये कारवाई करणारे. पो.नि. अनिरुध्द पुरी, सपोनि प्रमोद सोनवणे, पोउपनि रणजीत माजगावकर, पोहवा अंकुश राठोड, पोअं आशिष बावणकर तसेच पोलीस ठाणे एमआयडीसी येथील पैरवी अधिकारी पोहवा नितीन शिरसाठ, नापोअं गुरुदास ताडपल्लीवार यांनी उत्कृष्ट काम केल्याने आरोपीविरुध्द दोषसिध्दी होऊन मा. न्यायालयाने आजीवन कारावासची शिक्षा ठोठावली. तसेच पोलीस ठाणे कोतवाली येथील तपास अधिकारी सपोनि संतोष बोयने यांनी गुन्हयाचा तपास व पैरवी अधिकारी सफौ प्रमोद यावले व गणेश डफ यांनी उत्कृष्ट काम केल्याने आरोपींविरुध्द दोषसिध्दी होऊन मा. न्यायालयाने आरोपीला शिक्षा ठोठावली.




**२) मा. पोलीस आयुक्त यांचे वस्तीगृहातील निराधार महिला व मुलींसोबत रक्षाबंधन :**

मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी आज दिनांक २८.०८.२०२६ चे १७.३० वा. चे सुमारास रक्षाबंधन सणाचे औचित्य साधुन सिव्हील लाईन येथील प्रियदर्शिनी निराधार महिला वसतीगृहास सदिच्छा भेट देऊन तेथील महिलांसोबत आपुलकिने संवाद साधून त्या एकटया नसुन नागपूर पोलीस सदैव त्यांचे पाठीशी उभे आहेत असा विश्वास त्यांना दिला. याप्रसंगी उपस्थित महिलांना मिठाईचे वाटप करुन त्यांचा सुखदु:खात सहभागी होत त्यांना स्नेह, सुरक्षितता व आधाराचा संदेश दिला.

''रक्षण ही केवळ जबाबदारी नाही तर विश्वासाचे नाते आहे. नागपूर शहर पोलीस प्रत्येक गरजु महिलेच्या सुरक्षिततेसाठी सदैव तत्पर आहेत''. नागपूर शहर पोलीसांच्या वर्दी पलिकडील माणुसकीचा स्पर्श देणारा हा उपक्रम त्यांचेसाठी भावनिक आधार ठरल्याची भावना वसतीगृहातील महिलांनी याप्रसंगी व्यक्त केली.





**३) मा. अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रभाग कार्यालय येथे गुन्हेगारांचा आदान–प्रदान कार्यक्रम संपन्न :–**

मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील यांचे संकल्पनेतुन दिनांक २८.०८.२०२६ रोजी, सकाळी १०.०० वा. नागपूर पोलीस आयुक्तालय दक्षिण प्रभाग अंतर्गत विविध पोलीस ठाणे येथील अभिलेखावरील एकूण ५२ सक्रिय आरोपींचे आदान–प्रदान हे अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग कार्यालय येथे पार पडले. आदान–प्रदान कार्यक्रमाचा मुळ उद्येश हा पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आरोपींची ओळख पटावी, आरोपींची गुन्हे पध्दती समजण्यास मदत व्हावी तसेच, त्याचेवर कोणकोणते, किती व कुठे गुन्हे दाखल आहेत याबाबत माहितीचे आदान–प्रदान सुलभरितीने करता यावे असा होता. कार्यक्रम प्रसंगी मा. अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रभाग, श्री. वसंत परदेशी, मा. पोलीस उपआयुक्त श्री सिंगा रेड्डी ऋषिकेश रेडडी, श्रीमती रश्मिता राव, श्री नित्यानंद झा, मा. सहायक पोलीस आयुक्त एमआयडीसी, सक्करदरा, अजनी व कळमणा हे उपस्थित होते. तसेच आरोपींना अटक करणारे व हजर आणणारे संबंधीत पोलीस ठाणेंचे ठाणेदार, तपास पथक व एमओबी पथकातील २४ अधिकारी व २९ अंमलदार हे आरोपींसह हजर होते.

मा. अपर पोलीस आयुक्त (दक्षिण विभाग) यांनी सीसीसी द्वारे चालणारी कार्यपध्दती त्याचप्रमाणे सिम्बा ॲप प्रणाली बाबत उपस्थीत पोलीस अधिकारी व अंमलदार यांना समजावुन, हजर आरोपींची इत्यंभुत माहिती सिंबा प्रणालीमध्ये वेळीच अद्ययावत करण्याबाबत, त्याचप्रमाणे आरोपींचे डोजीअर फार्म, फिंगरप्रिंटस्, मोडस ऑपरेंडी याबाबत माहिती प्राप्त करुन संकलित करावी. अटक आरोपीतांवर योग्य त्या प्रतिबंधक कार्यवाही कराव्यात अशा सुचना दिल्या.



**(कामगिरी)**

**१) पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ६ चे विशेष पथकाची कामगिरी : सट्टयाची खायवाडी करणारे आरोपींविरुध्द गुन्हा दाखल :**

मा. पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र. ६ यांचे विशेष पथक यांनी दिनांक २८.०८.२०२६ रोजी सट्टयाचे खायवाडीबाबत मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन, पोलीस ठाणे कपीलनगर हद्‌दीमध्ये ऑटोमोटिव्ह चौक, मेट्रो स्टेशन येथील सिमेंट कम्पाऊड जवळ रेड कारवाई करुन, कागदावरती आकडे लिहुन पैशांची खायवाडी करुन हार जीतचा जुगार खेळताना मिळुन आल्याने आरोपी क्र १) शेख रिझवान उर्फ सोनु कबाडी वल्द भुरे खान याचे कडुन नगदी ५५००/— रूपये मिळुन आले, आरोपी क्र ०२) सोनु गरीबदास वैद्य याचें कडुन १०००/— रूपये व एक नोकीया कंम्पनीचा किपॅड मोबाईल किमंती १०००/— रूपये, आरोपी क्र ०३) मोहम्मद कमर आलम वल्ड साबीर आलम याचेंकडुन ओपो कंपनीचा जुना वापरता मोबाईल कि.अ. २००० रूपये , आरोपी क्र ०४) सुरेश महादेवराव गायकवाड याचे कडुन एक जुना वापरता लावा कंपनीचा मोबाईल किंमती अ. १००० रूपये, आरोपी क्र ०५) आयुब खलील शेख वय ३२ वर्ष याचे कडुन नगदी ५०० रूपये नगदी असा मुद्येमाल मिळुन आला. घटनास्थळावरून ०३ जुने वापरते कल्क्युलेटर किमती अ. २०० रूपये, दोन पेपर खरडे किमंती अदाजे ४० रूपये, दोन पेन कि.अ. १० रूपये, ०२ टायगर प्रभात चे पिवळया रंगाचे पट्टया, दोन आकाशी रंगाचे डायमंड ची पट्टी, दोन गुलाबी रंगाचे अमर प्रभात चे पट्टी किमंत ००:०० रूपये असा एकुण ११२५० /— रूपये चा मुद्येमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपींविरुध्द पोलीस ठाणे कपीलनगर येथे कलम १२ अ महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरु आहे.

सदरची कारवाई मा. विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग यांच्या मार्गदर्शनात श्री. रमेश धुमाळ, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ क्रं ६ नागपूर शहर यांचे देखरेखीखाली विशेष पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे.

**२) शांतीनगर पोलीसांची कामगिरी :— हरविलेल्या मुलीचा तत्परतेने शोध.**

दिनांक २७.०८.२०२६ चे १९.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे शांतीनगर हद्दीत राहणारी १४ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही तिचे राहते घरी कोणाला काहीही न सांगता घरून निघुन गेली होती. ती घरी परत न आल्याने प्राप्त तक्रारीवरून मुलीचा शोध सुरु करण्यात आला.

शोधादरम्यान शांतीनगर पोलीसांनी मुलगी वापरत असलेल्या फोनचा तांत्रिक तपास करुन डिलीट करण्यात आलेले मॅसेजेस वरुन, विजयंत ट्रॅव्हल्स्चे प्रयागराज येथील तिकीट प्राप्त झाल्याने मिळालेलया माहीतीवरुन, ट्रॅव्हल्सशी संपर्क केला असता, नमुद मुलगी ही बसमध्ये असल्याची खात्री झाली. बस शिवनी, मध्यप्रदेश येथे असल्याने, बसचालकासोबत संपर्क करून शिवनी येथील कोतवाली पोलीस ठाणे येथे बस नेण्याबाबत सुचना दिल्या व शिवनी पोलीसांशी समन्वय साधुन मुलीला शिवनी पोलीसांनी सुरक्षितपणे ताब्यात घेतले. मुलीचे कुटुंबियासोबत संपर्क साधुन पोलीसांनी मुलीला सुरक्षितपणे ताब्यात घेतले व तिचे समुपदेशन करण्यात आले. विचारपुस केली असता, मुलगी ही मागील एक वर्षापासुन इंस्टाग्रामचे माध्यमातुन अज्ञात व्यक्तिचे संपर्कात असल्याचे व त्याने तिचा विश्वास संपादन करुन तिला तिकीट पाठवून प्रयागराज येथे बोलविल्याचे समजले. शांतीनगर पोलीसांनी तात्काळ दखल घेऊन, तांत्रिक तपास व आंतरराज्यीय पोलीसांशी समन्वय साधुन मुलीचा वेळीच शोध घेतला व मुलीला सुखरुप तिचे पालकांचे स्वाधीन केले.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग), मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ३), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली, वपोनि. गजानन तामटे, पोउपनि प्रशांतराज जाधव व त्यांचे पथकाने केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे एमआयडीसी :— हद्पार ईसमास अटक.**

दिनांक २८.०८.२०२६ चे ०९.३० वा. चे सुमारास, एमआयडीसी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, आमोल कंपनीजवळ एमआयडीसी परिसरात एक हद्यपार इसम फिरत असुन त्याने हिरव्या रंगाचा शर्ट घातलेला आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा इसम पोलीसांना पाहुन पळुन जात असता, त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव भोला सुरेश राऊत वय २२ वर्षे रा. यु—९५, विश्वकर्मा कंपनीजवळ, एमआयडीसी, नागपूर असे सांगीतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०१/२०२६ दिनांक ०७.०८.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने फिरतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे एमआयडीसी येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे वाडी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

पोलीस ठाणे वाडी हद्दीत प्लॉट क्र. १४४, हरीओम सोसायटी, दत्तवाडी, नागपूर येथे राहणारे फिर्यादी चंद्रप्रकाश चंदुलाल रहांगडाले वय ४० वर्ष हे इलेक्ट्रीक कामाचे ठेकेदार असून त्यांची पत्नी व मुले सासऱ्यांचे निधन झाल्याने सासुरवाडीला हिंगणा येथे गेले होते. फिर्यादी व त्यांची आई हे दिनांक २७.०८.२०२६ चे १४.०० वा. ते २१.३० वा. चे दरम्यान राहते घराला कुलुप लावुन कामावर गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, घरातील दोन्ही लोखंडी आलमारीतील रोख १०,१५,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १७,९९,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे पोउपनि. संतोष शिरडोळे ८८८८८७६५८३ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे कळमणा :—** दिनांक २६.०८.२०२६ चे २०.४५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कळमणा हद्दीत, नागपूर—जबलपुर हायवेवर, पावनगाव जवळ, इसम नामे मनिष अनुप पंचेश्वर वय ४० वर्ष रा. बनाथर ता. केवलारी जि. गोवती, मध्यप्रदेश हे अपघात होऊन त्यांचे मोटर सायकल सह बेशुध्द अवस्थेत मिळून आल्याने, पोलीसांनी त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल, ट्रॉमा आयसीयु—२ येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक २८.०८.२०२६ रोजी ०८.४५ वा. डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे कळमणा येथे पोउपनि. भरत गावित यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**पोलीस ठाणे इमामवाडा :—** श्रीमती अन्नपुर्णा हरीभाऊ सोमकुंवर वय ६५ वर्षे रा. पाचनल चौक, इमामवाडा, नागपूर हया दिनांक ०६.०८.२०२६ रोजी १९.०० वा. पासुन पोलीस ठाणे इमामवाडा हद्दीतील राहते घरून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. आजपावेतो घरी परत आल्या नाहीत. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाहीत. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची—४ फुट, केस—काळे लांब, अंगात—गुलाबी रंगाची साडी घातलेली आहे. भाषा—हिंदी/मराठी बोलतात. त्या मानसिक रुग्ण आहेत.



श्रीमती अन्नपुर्णा

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. तदर्थ जिल्हा न्यायाधिश—२ तथा अति. सत्र न्यायाधीश, नागपुर. | १७७/ २०२६ | कलम ३५३, १४३,१४९, ३४१,३३६, ३३७, ३३२, ४२७ भा.दं.वि. | १) दिलीप प्रजापती वय २६ वर्ष रा. अजनी, नागपुर<br>२) विजय गायकवाड वय ३० वर्ष रा. नंदनवन, नागपूर<br>३) प्रविण मेश्राम वय २६ वर्ष रा. चंद्रमणीनगर, अजनी नागपूर<br>४) राजा वानखेडे वय २५ वर्ष रा. अजनी, नागपूर<br>५) मनोहर बुरबुरे वय २९ वर्ष रा. नंदनवन, नागपूर<br>६) देवानंद बुरबुरे वय २४ वर्ष रा. नंदनवन, नागपूर<br>७) सुखदेव कांबळे वय ३० वर्ष रा. चंद्रमणीनगर, अजनी नागपूर | ०२.०९.२०२६ |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**